राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

# तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय खेड

ता.खेड, जि.रत्नागिरी

पत्ता:- तालुका आरोग्य अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय कळंबणी बु. येथिल बाजुची नवीन इमारत ता.खेड, जि.रत्नागिरी

फोन नं. :- ०२३५६ - २६४७७७ फॅक्स नं.:- ०२३५६ - २६४७७७

ई मेलं :-khed.ratnagiri2@gmail.com

जा.क्र.ता.आ.अ.कार्या/एनएचएम/खेड/ 78 /२०२६
तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय खेड,
दिनांक -०९/०२/२०२६

## दरपत्रक सुचना

**विषय- राष्ट्रीय अरोग्य अभियान १५ वा वित्त आयोग अंतर्गत फ्रिज खरेदीबाबत.**

तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी येथील १५ वा वित्त आयोग अंतर्गत नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र भरणे, व क्षेत्रपाल नगर खेड, आपला दवाखानातसेच, BPHU येथे मेडिसिन ठेवण्याकरिता रेफ्रिजरेटरची आवश्यकता आहे. सदर खरेदी करण्यासाठी त्यासाठी स्थानिक पातळीवरुन स्थानिक ठेकेदारांकडून दोन लिफाफा पध्दतीने सिलबंद खोटयामध्ये दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | प्रकार | तपशिल | नग |
|---|---|---|---|
| १ | फ्रिज | कंपनी -Haier, | १ |
| | | लिटर - १९० | |
| | | स्टार - ५ | |
| | | वॉरंटि कंप्रेसर - १० वर्ष | |

तरि वरील प्रमाणे आपणदरपत्रक करणेसाठी इच्छुक असाल तर आपले बाजार भावाचे (**सर्व करासहित**) दरपत्रक या कार्यालयाकडे दिनांक - १६.०२.२०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत पोहोचेल या बेताने पाठवावे.

**लिफाफा १ (तांत्रिक) मध्ये पुढील कागदपत्र असणे आवश्यक आहे -**

१) शॉप अॅक्ट लायसन्स/ व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रझेरॉक्स प्रत.
२) जीएसटी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत किंवा प्रमाणपत्र नसल्यास लेखापरिक्षक (CA) यांनी प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत.
३) पॅन कार्ड व आधारकार्ड झेरॉक्स प्रत.

**लिफाफा २ (आर्थिक) मध्ये पढील कागदपत्र असणे आवश्यक आहे -**

सदरचे तांत्रिक व आर्थिक लखोटा स्वतंत्र लखाटयामध्ये सिलबंद करुन तालुका आरोग्य अधिकारी, ता.खेड, जि. रत्नागिरी यांचे नावे कार्यालयीन वेळेत हे दरपत्रक प्रसिध्द झाले पासून अंतिम तारखेपर्यंत कार्यालयात पोहोच होतील असे पाठविण्यात यावेत.

प्राप्त दरपत्रके हि दिनांक १७/०२/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. तालुका आरोग्य अधिकारी, ता.खेड, जि.रत्नागिरी यांच्या दालनात उघडण्यात येतील. दरपत्रके मंजुर वा नामंजुर करणेचा अधिकार तालुका आरोग्य अधिकारी खेड यांनी आपल्याकडे राखुन ठेवणेत आला आहे.

अटी व शर्ती -

१) साहित्य पुरवठा स्पेसिफिकेशन प्रमाणे नसलेस तो स्विकारला जाणार नाही. पुरविण्यात येणारे साहित्य हे उत्तम दर्जाचे व गुणवत्ता पूर्ण असणे बंधनकारक आहे. तसेच पुरविलेले साहित्याचा दर्जा/गुणवत्ता/स्थिती याबाबतीत भविष्यात कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा दोष उद्‌भवल्यास त्याचे सर्व प्रकारचे निराकरण करुन देण्याची जबाबदारी पुरवठादार याची राहील.

२) साहित्य पुरविणेचे दर ( जीएसटीसह) सर्वकरा सहपुरविणेचे आहेत. शासन नियमानुसार सर्व देयकेही GST Softwareजनरेटेड व HSN कोडसह देणेत यावीत.

३) शासन नियमानुसार वेळोवळी लागू केले जाणारे सर्व प्रकारचे कर आपले देयका मधून कपात करुन देयके अदाकेली जातील. याबाबत कोणतीही तक्रार गाहय धरली जाणार नाही.

४) पुरविलेले साहित्य पुरवठा आदेशनुसार पुरविले आहे किंवा नाही हे वेळोवेळी व जरुरीनुसार तपासून पाहणेचा अधिकार - मा. तालुका आरोग्य अधिकारी, ता.खेड यांना राहील. तपासणीमध्ये साहित्य पुरवठा कमी व साहित्याचा दर्जा योग्य नसलेचे आढळून आल्यास ते प्रमाणानुसार तात्काळ देणे पुरवठादारावर बंधनकारक राहील. याबाबत अडचण आलेस सर्वस्वी जबाबदारी पुरवठादारांची राहील. असे वारंवार निदर्शनास आल्यास निविदा रद्द करण्याबाबत पुढील कारवाई करणेत येईल.

५) पुरवठा आदेशा नुसार साहित्याचा पुरवठा केलेनंतर त्यांचे योग्य ते शासकिय नियमानुसार लेखी बील - तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय खेड, जि. रत्नागिरी या कार्यालयाकडे सादर करुन ते बील मिळाले नंतरपेमेंट SNA प्रणाली द्वारे १ महिन्याच्या आत आपल्या बँक खाती जमा होतील.

६) परिस्थिती नुसार नियम, अटी व शर्ती कमी/जास्त करणेचा अथवा शिथील करणेचा अधिकारी- तालुका आरोग्य अधिकारी खेड, जि. रत्नागिरी यांना राहील.

७) सदर पुरवठा आदेश - दि. ३१.०३.२०२६ पर्यंत लागू असतील.

८) १ वर्षापर्यंत साहित्याची नादुरुस्ती अथवा अकार्यशील असलेस सदर दुरुस्तीची जबबादारी पुरवठादाराची राहील याची नोंद घ्यावी. सदर दुरुस्तीबाबत कोणतीही अतिरिक्त रक्कम दिली जाणार नाही.

९) कोणत्याही एका अथवा सर्व निविदा मंजूर करणे अथवा नामंजूर करणेचा अधिकार मा. तालुका आरोग्य अधिकारी खेड, जि. रत्नागिरी यांनी राखून ठेवला आहे. त्याबाबत त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

१०) सदर कामी संपूर्ण पूर्तता करार पत्राप्रमाणे करणेची जबाबदारी पुरवठादार यांची आहे. यामध्ये पुरवठादार यांचेकडून हयगया झालेस त्यामुळे होणारे नुकसानीस व त्याचे भरपाईस पुरवठादार जबबादार असतील.

११) भविष्यात कोणतेही प्रकारची दरवाढझालेस अगर शासकिय करात बदल झाल्यास सदर पुरवठयास कोणत्याही प्रकारी दरवाढ पुरवठादाराने मागणेची नाही.

१२) सदर साहित्याचे दरबाजार भावापेक्षा जास्त आहेत असे आढळल्यास साहित्याचे देयक बाजार भावानुसारच अदा करणेत येईल. याबाबत पुरवठादाराची कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

१३) पुरवठा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१४) मुदतीनंतर पुरवठा केल्यास प्रति आठवडा ०.५ टक्के वसुली करणेत येईल.

वरील प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्याचा रक्कम रुपये १००/- चा बॉन्ड देणेत यावा

Shailesh

तालुका आरोग्य अधिकारी
ता. खेड जि. रत्नागिरी

कार्यालयाचा पत्ता

तालुका आरोग्य अधिकारी, खेड जि.रत्नागिरी यांचे कार्यालय,
उपजिल्हा रुग्णालय कळंबणी बु. येथिल बाजुची नवीन इमारत
संपर्क क्रमांक .७०२०७५६०४९

प्रत:-१) नोटीस बोर्ड
२) शासन संकेत स्थळ